# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक ७ जुलै, २०२५
## ( सकाळी ११.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : शोक प्रस्ताव -**

श्री. अशोक राजाराम पाटील (डोणगावकर), माजी वि.स.स. व माजी राज्यमंत्री; श्री. लहानू बाळा आहिरे, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | **मुख्यमंत्री** | : | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा एकोणीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (२) | **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** | : | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (३) | **परिवहन मंत्री** | : | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक - १)**

(१) **श्री. आमश्या पाडवी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अक्कलकुवा तालुक्यातील नेवासा अंकुश विहीर अंतर्गत येणाऱ्या बाबानगर अंगणवाडी केंद्रावर शांता जयंतलाल तडवी या मदतनीस म्हणून कार्यरत असणे, त्यांना दिनांक १ सप्टेंबर, १९९६ रोजी ५० रुपये मानधनावर पहिली नियुक्ती देण्यात येणे, दिनांक २८ जून, २००६ रोजी ६४० रुपये मानधनावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने दुसरी नियुक्ती देण्यात आली असणे, सेवेत असताना दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी शांता तडवी यांचे दु:खद निधन होणे, तडवी यांच्या निधनानंतर बाबा अंगणवाडी बाल विकास प्रकल्प अधिकारी पर्यवेक्षिका यांनी

संगनमत करून त्यांना मयत न दाखवता त्यांच्या जागी त्यांच्या नावावर दुसऱ्या महिलेला कामावर ठेवणे, त्या महिलेचा फोटो लाऊन नवीन नियुक्ती मिळालेल्या महिलेच्या बँक खात्यावर मानधन जमा करणे, मयत मदतनीसाच्या नावावर काम करणारी महिला व संगनमत करून मदतनिसाला मयत न दाखवता शासनाची दिशाभूल करून दुसऱ्या महिलेच्या नावाने मानधन काढणे, बालविकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांच्यावर शासनाने कारवाई न करणे, याप्रकरणी स्थानिक आमदार लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी शासनाकडे पत्रव्यवहार करून त्याची दखल न घेणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) सर्वश्री. अनंत (बाळा) नर, सुनिल प्रभू, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जोगेश्वरी पूर्व विधानसभा कार्यक्षेत्रातील आरे कॉलनीतील फिल्म सिटी परिसरात दिनांक २० फेब्रुवारी, २०२५ रोजी लागलेली भीषण आग, फिल्म सिटीमधील सेटचे सामान आणि जुने लाकडी सामान ठेवण्याची गोदामे कारणीभूत असल्याचे समोर येणे, सदर आगीमुळे येथील झोपडपट्टयांचे मोठे नुकसान होणे, २०० ते २५० नागरिकांचे तात्पुरत्या स्वरुपात महानगरपालिका शाळेत पुनर्वसन करणे, येथील संतोष नगर परिसरात मागील काही महिन्यांपासून अनधिकृत लाकडांचे गोदाम असणे, याबाबत सातत्याने महानगरपालिकेच्या पी दक्षिण विभागास तक्रारी करुनही कोणतीच कारवाई न करता गोदामांना संरक्षण देण्याचा होत असलेला प्रयत्न, उक्त पी दक्षिण विभागांमध्ये अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणाचे प्रमाण वाढलेले असतांनाही पालिकेच्या अधिकाऱ्यांकडून कारवाई करण्यास जाणीवपुर्वक होत असलेले दुर्लक्ष, संतोष नगरमधील संत निरंकारी मार्गावर मोठया प्रमाणात अनधिकृत झोपडया तसेच गोदामे वाढलेली असणे, यास पी दक्षिण महापालिकेचे असलेले अभय, याठिकाणी कुठलीही अग्निसुरक्षेची उपाययोजना नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर आगीत नुकसान झालेल्या झोपडपट्टीवासियांना अभय देऊन त्यांचे पुनर्वसन व आर्थिक मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून अनधिकृत गोदामावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(३) श्री. भीमराव केराम, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री रामदास मसराम, सुरेश धस, विनोद निकोले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मंत्रालयात आदिवासींच्या विविध विभागातील राखीव ५० जागा बिगर आदिवासींनी बळकावल्या असल्याचे निदर्शनास येणे, अवर सचिव, कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी, लिपिक, टंकलेखक, उच्च श्रेणी लघु टंकलेखक, यात समावेश असणे, अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर ५० जणांनी आदिवासी म्हणून नियुक्ती मिळविल्या असल्याचे निदर्शनास आल्याने हे प्रकरण न्यायालयात जाणे, आदिवासी जमातीचे ३९ जणांचे जात प्रमाणपत्र अवैध झाले असणे,त्यांनी विशेष मागास प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याचे आढळून येणे, ७ जणांचे उच्च

न्यायालयात प्रकरण प्रलंबित असणे, ४ जणांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने त्यांची सेवा समाप्त करण्याचे प्रस्तावित असणे, हे सर्वजण अधिसंख्य पदावर कार्यरत असणे, सर्वोच्च न्यायालयाचा याबाबत दिनांक ६ जुलै २०१७ रोजी निर्णय असणे, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक २८ सप्टेंबर २०१८ रोजी निर्णय देत भरती प्रक्रिया नव्याने राबविण्याचे निर्देश दिले असणे, त्या अनुषंगाने राज्य शासनाने आदिवासी समाजाच्या विशेष पदभरती करिता दिनांक २१ डिसेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केले असणे, मात्र एकीकडे शासन भरती प्रक्रिया राबवत असताना दुसरीकडे आदिवासींसाठी राखीव असलेल्या ५० पदांचा निर्णय अद्याप घेतलेला नसणे, त्यामुळे बेरोजगार आदिवासी उमेदवारांची पदभरती थांबविण्याबाबत होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"ख्रिश्चन व मुस्लिम धर्मीय लोकांमध्ये परंपरेनुसार मृतदेह दफन करण्याची प्रथा प्रचलित असणे, परंतु मुंबई दहिसर कांदरपाडा येथील ख्रिश्चन स्मशानभूमी लगतच्या भागात स्थानिक ख्रिश्चन धर्मीय नागरिकांच्या तक्रारीनुसार आणि अलीकडील निरीक्षणात असे दिसून येत आहे की, काही ठिकाणी दफनभूमीत योग्य ती जीवाणुनाशक प्रक्रिया (disinfection) न करता मृतदेह दफन केल्यामुळे आरोग्यास गंभीर धोके निर्माण झालेले असणे, विशेषत: दफन झाल्यानंतर काही मृतदेहांमधून हानिकारक बॅक्टेरिया व विषारी घटक जमिनीत झिरपत असणे, हे घटक जमिनीच्या खोल थरांमध्ये प्रवेश करून आसपासच्या विहिरींमधील पाणी प्रदूषित करत असणे, याचा संभाव्य परिणाम पिण्याच्या पाण्यावर तसेच स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यावर होत असणे, भविष्यात यामुळे पाणजन्य रोगांचा फैलाव होण्याची शक्यता नाकारता येत नसून प्रशासनामार्फत पाणवठ्यांची नियमित तपासणी व जलपरीक्षण करणे बंधनकारक करणे व सर्व दफनभूमींसाठी निर्धारित जीवाणुनाशक प्रक्रिया अनिवार्य करण्याचे आदेश जारी करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) सर्वश्री. प्रशांत ठाकूर, समीर कुणावार, महेश बालदी, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अभिमन्यु पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे लक्ष वेधतील:-**

"खारघर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील नागरिकांचा सुरूवातीपासूनच दारू विक्रीची दुकाने व दारू पिण्याचे बार यांना खारघरमध्ये सक्त विरोध असणे, बहुतांशी सुशिक्षित नागरिकांची वस्ती असलेला खारघर नोड शैक्षणिक हब म्हणून ओळखला जाऊ लागला असणे, खारघर नोडला दारूमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सर्वानुमते ठराव मंजूर केला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, खारघरनोड विकसित झाल्यापासून एकही दारू विक्रीचे दुकान उक्त परिसरात अस्तित्वात नसणे, अशा परिस्थितीत शैक्षणिक हब म्हणून ओळखल्या जाणा-या खारघर परिसरात

संबंधित विभागामार्फत गोल्डन कॉईन वाईनमार्ट हे नवीन वाईन शॉप से.६ खारघर येथे उघडण्यात आले असणे, खारघर परिसरात दारू बंदी करण्यासाठी तत्कालीन उत्पादन शुल्क मंत्री यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे २५ टक्के नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी गुप्त पद्धतीने मतदान घेऊन विहित प्रक्रीया पूर्ण करावी असे आश्वासन अधिवेशनाच्या कालावधीत सभागृहात दिले असणे, उक्त परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी अनेक आंदोलने व निवेदने देऊनसुद्धा दारू विक्रीचा परवाना दिल्यावर कोणतीच कारवाई झाली नसणे, त्यामुळे दारू विक्रीचा परवाना दिल्यामुळे खारघर परिसरात वातावरण गढूळ होऊन नागरिकांच्या विशेषत: महिला वर्गाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या प्रचंड असंतोषाबाबत शासनाने खारघर परिसरातील दारू विक्री परवाना रद्द करून दारूमुक्त क्षेत्र (No Liquor Zone) म्हणून घोषित करण्याबाबत तातडीने करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(६) सर्वश्री. हिरामण खोसकर, विजयसिंह पंडित, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"यांत्रिकी विभाग, जलसंपदा, नाशिक या विभागात जितेंद्र मुकुंद पाटील हे कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असणे, त्यांनी सदर विभागातील सेवा कालावधीत काही कंत्राटदारांना हाताशी धरुन कोटयवधी रुपयांच्या निविदा निधी उपलब्ध नसतांना केल्या व शासनावर आर्थिक दायित्व निर्माण केल्याचे निदर्शनास येणे, मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक यांचे परिपत्रकावरुन असे दिसून येते की, सदर कार्यकारी अभियंता यांनी सदर निविदांना शासकीय निधी उपलब्ध नसतांना देखील सदर कंत्राटदारांच्या निविदांची कोटयवधीची देयके ८४४३००२७/१०३-सिक्युरिटी डिपॉझिट या लेखाशिर्षकांतर्गत अदा करुन अनियमितता केल्याचे दिसून येणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ जून, २०२५ रोजीच्या सुमारास मा.जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन देण्यात येणे, तसेच त्यांची सदर ठिकाणहून बदली झालेली असतांना, तसेच त्यांच्या विरोधात भ्रष्टाचाराचे पुरावे असताना त्यांची कोणत्याही प्रकारे चौकशी वा कारवाई करण्यात न येणे, शासनाची कोटयवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या या अभियंत्यावर कारवाई होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कारवाई तसेच शासनाची प्रतिक्रिया."

**(७) सर्वश्री. विजय वडेट्टीवार, सुरेश धस, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी हाफकिन बायोफार्मास्युटिकल कॉर्पोरेशनच्या पुरवठा सेलने दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ रोजी सुमारे २ कोटी १२ लाख रुपयांची औषधे खरेदी केली असून, या खरेदीत गंभीर अनियमितता झाली

असल्याची बाब माहे जून, २०२५ मध्ये उघडकीस येणे, विशेष म्हणजे, ही औषधे कर्मचारी राज्य विमा निगमने (इएसआयसी) प्रतिबंधित आणि निकृष्ट दर्जाची (एनएसक्यू) घोषित केलेली असूनही तीच उत्पादने खरेदी करण्यात येत असणे, सदर प्रकरणात पँटोप्राझोल ४० मि.ग्रॅ./१० मि.ली. इंजेक्शन (१० मि.ली. वायल) आणि Esch Tab/CrF (Vildaglptin vq मि. ग्रॅ. + Metformin Hydrochloride १००० मि. ग्रॅ.) या दोन औषधांचा समावेश असणे, ही औषधे गाल्फा लॅबोरेटरीज लिमिटेड आणि बजाज हेल्थकेअर लिमिटेड या कंपन्यांकडून ईएसआयसी दर कराराअंतर्गत खरेदी करण्यात येणे, मात्र, ईएसआयसीने दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजीच या दोन्ही औषधांना प्रतिबंधित आणि निकृष्ट दर्जाचे ठरवून याबाबतचे परिपत्रक संबंधित सर्व शासकीय यंत्रणांना कळवले असल्याचे समोर येणे, तरीही केवळ दोन महिन्यांनंतर हीच औषधे हाफकिनकडून खरेदी करण्यात येणे, औषध खरेदी संदर्भातील नियम, कायदे आणि रुग्णांच्या आरोग्याच्या सुरक्षेचा भंग झाल्याचा आरोप संघटनेने शासनाकडे केला असणे, ही औषधे वैद्यकीय महाविद्यालयांत वितरित झाल्यामुळे हजारो रुग्णांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

**(८) श्री. महेश शिंदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात अलीकडच्या काळात प्रत्येक समारंभामध्ये, मंगल कार्यालय, मंदिरे अथवा इतर सुखदुःखाच्या कार्यक्रमांमध्ये कृत्रिम फुलांच्या अतिरिक्त वापरामुळे सर्व प्रकारच्या फुलांची बाजारपेठ पूर्णपणे उध्वस्त झालेली असणे, सुरुवातीच्या काळामध्ये फक्त ग्रीन हाऊस शेतकरी यामध्ये भरडला जात असणे, मुख्यत्वे करुन सातारा जिल्ह्यामध्ये सुमारे १३०० ग्रीन हाऊसेस होती, ज्यांच्यावरती संपूर्ण गावे उभारीस आली, वर्णे हे त्यापैकीच एक गाव या एकाच गावामध्ये सुमारे ३७५ ग्रीन हाऊस असणे, गेल्या पाच ते सात वर्षांपासून कृत्रिम फुलांच्या प्रचंड मोठ्या वापरामुळे बाजारात खरी फुले दुर्मिळ झाली व आता सातारा जिल्ह्यात ५० पेक्षा कमी ग्रीन हाऊसेस शिल्लक राहिली त्यांची परिस्थिती देखील चांगली नसणे, मात्र आता ही परिस्थिती आणखीन गंभीर होऊन बाहेरच्या फुल उत्पादक शेतकऱ्यांवर देखील येऊन ठेपलेली असणे, कृत्रिम अथवा खोट्या झेंडूच्या, निशिगंधाच्या माळा आपल्याला आता सर्वत्र पाहायला मिळत असणे, त्यामुळे हा शेतकरी पूर्णपणे हतबल झालेला असणे, संपूर्ण शेतीच्या जवळपास २० ते २५ टक्के शेतकरी हे फुल उत्पादनामध्ये काम करत असणे त्यामुळे हा वर्ग खूप मोठा असणे, यासंदर्भातील दरवर्षी हजारो कोटींची आर्थिक उलाढाल विचारात घेता याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**पाच : सन २०२५-२०२६ या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस)**

(१) गृह विभाग

(२) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(३) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

(४) मराठी भाषा विभाग

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**सहा : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७५ - महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५

---

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**(१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७३ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२५

**(२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७४ - महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५

---

**(क) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार व संमत करणे** :-

(१) (क) **सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) (क) सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक, २०२५**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री.साजिद पठाण, रामदास मसराम व हेमंत ओगले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक, २०२५ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**सात : (शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री योगेश सागर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, सिध्दार्थ शिरोळे, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री दिपक केसरकर, विजय शिवतारे, संजय केळकर, संजय बनसोडे, रमेश बोरनारे, संभाजी निलंगेकर-पाटील, मंगेश कुडाळकर, चेतन तुपे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री प्रकाश सुर्वे, शेखर निकम, ॲड.पराग अळवणी, राजेंद्र गावित, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री अतुल भातखळकर, प्रकाश सोळंके, प्रदीप जैस्वाल, प्रशांत ठाकूर, अशोक पाटील, अनिल पाटील, किसन कथोरे, शांताराम मोरे, राजकुमार बडोले, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री दिलीप लांडे, महेंद्र थोरवे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री प्रताप पाटील-चिखलीकर, महेंद्र दळवी,**

**डॉ.राहुल आहेर, श्री.तुकाराम काते, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री भिमराव तापकीर, निलेश राणे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री अमीत साटम, सुहास कांदे, सचिन पाटील, रणधीर सावरकर, श्रीमती सना मलिक, सर्वश्री मुरजी पटेल, राम कदम, विश्वनाथ भोईर, दिलीप बनकर, विलास तरे, शरद सोनवणे, कॅ. आर. तमील सेल्वन, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री राजेश मोरे, मिहिर कोटेचा, प्रवीण दटके, हिरामण खोसकर, पराग शाह, चंद्रकांत नवघरे, शंकर जगताप, कालिदास कोळंबकर, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री संजय उपाध्याय, कुमार आयलानी, मंगेश चव्हाण, राजन नाईक, श्रीमती स्नेहा दुबे, सर्वश्री नरेंद्र मेहता, महेश लांडगे, रविंद्र चव्हाण, अभिमन्यू पवार, डॉ. अतुल भोसले, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संतोष दानवे, हेमंत रासने, सत्यजित देशमुख, गोपीचंद पडळकर, ॲड. राहुल कुल, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, सुनिल कांबळे, सुरेश भोळे, विक्रम पाचपुते, डॉ.संजय कुटे, श्री. राजेश वानखडे, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री विलास भुमरे, राजेश बकाने, समीर कुणावार, डॉ. आशिष देशमुख, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किशोर जोरगेवार, सुमित वानखेडे, हरिष पिंपळे, राघवेंद्र पाटील, शिवाजी कर्डिले, सर्वश्रीमती श्वेता महाले, मोनिका राजळे, सर्वश्री चैनसुख संचेती, समीर मेघे, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री बबनराव लोणीकर, किर्तीकुमार भांगडिया, प्रशांत बंब, नारायण कुचे, राणाजगजितसिंह पाटील, प्रकाश भारसाकळे, राजू तोडसाम, सुरेश धस, राजेश पवार, देवराव भोंगळे, करण देवतळे, जितेश अंतापुरकर, डॉ. तुषार राठोड, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री समाधान आवताडे, देवेंद्र कोठे, सुभाष देशमुख, विजय देशमुख, मनोज घोरपडे, राहुल आवाडे, अमल महाडिक, धनंजय गाडगीळ, रत्नाकर गुट्टे, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील मुंबई, एमएमआरडीए, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर इ. महसुली जिल्हे व्यापारदृष्ट्या एकमेकाशी जोडलेले असणे, मुंबई तर देशाची ग्रोथ इंजिन असणे, मुंबई आणि जेएनपीटी पोर्टनंतर वाढवण बंदर राज्याला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार असणे, याठिकाणी नव्या विमानतळाची उभारणी करण्याबरोबरच नवी मुंबई, नैनाच्या माध्यमातून तिसरी आणि वाढवण बंदर प्रकल्पाच्या ठिकाणी चौथी मुंबई वसविण्याचे प्रस्तावित असणे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ प्रस्तावित असणे, वाढवण बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रीक टन मालाची हाताळणी करणे शक्य असणे, महाराष्ट्रासह देशाच्या विकासात हे बंदर 'गेमचेंजर' ठरणार असणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेचे चतुर्थ श्रेणी कामगार तसेच गिरणी कामगार यांच्या घरांचा प्रश्न तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुर्नविकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई उपनगरातील जुन्या व अत्यंत मोडकळीस आलेल्या भाडेकरूंच्या इमारतींना महापालिकेने नोटीस दिल्यानंतर व महापालिकेने किंवा घरमालकाने तोडल्यानंतर १५-१५ वर्षे त्या तशाच अवस्थेत पडून

असल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या मोठ्या शहरांच्या मेगापॉलीस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ही महानगरे जागतिक पटलावर उच्च दर्जाची व्हावी ही शासनाची महत्वांकाक्षा असणे, मुंबईसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ६४,७८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, "ग्रोथ हब" संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेशात ७ जागतिक व्यापार केंद्रे विकसित करण्याची योजना असणे, "वेव्हज" परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि देशभरातील माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्राला ग्लोबल प्लॅटफॉर्म प्राप्त होण्यासोबतच मुंबई जागतिक माध्यम-मनोरंजन उद्योगाची राजधानी म्हणून विकसित व्हावी हा शासनाचा निर्धार असणे, यामध्ये मेट्रो जाळयाचा विस्तार, रस्ते विकास व वाहतुक सुविधांचा समावेश असणे, मुंबई, पुणे आणि नागपूर मध्ये १४३.५७ कि.मी. चे मेट्रोमार्ग कार्यरत असणे, नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर (इनोव्हेशन सिटी) उभारण्यात येणार असणे, पुणे शहरात पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्हयातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर विचार करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाडयांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतीमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी शहरे विकसित करण्याची व तेथील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, मुंबई, नागपूर व पुणे महानगरातील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा व वातानुकुलीत वाहतुक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण १४३.५७ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले असणे, ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली असणे, पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला-स्वारगेट हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या दोन मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असणे, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम दृष्टीक्षेपात असणे, नवी मुंबईतील उलवे येथे १,१६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतराराष्ट्रीय विमानतळाचे काम ८५ टक्के पूर्ण झालेले असणे, गडचिरोली हा विकसित जिल्हा बनला असून त्याठिकाणी खनिज संपत्तीचा योग्य वापर करण्यात येऊन 'गडचिरोली स्टील सिटी' हा महत्वाकांक्षी प्रकल्प तेथे साकारण्याचे प्रयोजन असणे जेणेकरुन त्या भागात मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकेल, मुंबई-नागपूर समृध्दी द्रुतगती मार्ग गोंदिया आणि गडचिरोलीला जोडण्याचे प्रस्तावित असणे, नागपूरच्या भोसले राजघराण्यातील राजे रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून आपल्या राज्यात परत आणण्यात राज्य शासनाला मिळालेले ऐतिहासिक यश, राज्यात एआय पॉलिसी, एआय विद्यापीठ, सायबर सिक्युरिटी इ. धोरणांची अंमलबजावणी करण्यात राज्य अग्रेसर असणे, महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला भविष्यातील विकासासाठी जोडण्याचा या शासनाचा प्रयत्न असून सुखी, संपन्न, समृध्द, प्रगत, पुरोगामी सुधारणावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : (शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, सुनिल प्रभू, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. दिलीप सोपल, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पाटील, अजय चौधरी, अमित देशमुख, रोहित पवार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमीन पटेल, उत्तमराव जानकर, कैलास घाडगे-पाटील, अस्लम शेख, नितीन देशमुख, सुनिल राऊत, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री संजय पोतनीस, बापूसाहेब पठारे, वरुण सरदेसाई, अमित झनक, अनंत (बाळा) नर, अभिजीत पाटील, हारुन खान, शिरीषकुमार नाईक, सिध्दार्थ खरात, संदिप क्षिरसागर, नारायण पाटील, गजानन लवटे, विकास ठाकरे, महेश सावंत, मनोज जामसुतकर, साजिद खान पठाण, प्रविण स्वामी, संजय मेश्राम, रामदास मसराम, संजय देरकर, बाबाजी काळे, हेमंत ओगले, डॉ. ज्योती गायकवाड, श्री.अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्याचे कृषी मंत्री सिन्नर तालुक्यात नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करतांना त्यांनी" ढेकळांचे पंचनामे करायचे का ?" असे शेतकऱ्यांच्या भावना दुखावणारे केलेले वक्तव्य, जालना जिल्ह्यातील परतूर विधानसभा मतदार संघात "हर घर सौर" योजनेवरील एका कार्यक्रमात सत्तारुढ पक्षाच्या एका विधीमंडळ सदस्याने "आपल्यामुळे कपडे, बूट, मोबाईल योजनांचे आर्थिक फायदे आणि पेरणी करण्यासाठी पैसे मिळतात" असे शेतकऱ्यांना उद्देशून उद्‌गार काढणे, मे, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यामध्ये राज्यातील सर्वच भागात वादळी वाऱ्यांसह मुसळधार झालेला पाऊस, त्यामुळे अनेक जिल्ह्यात निर्माण झालेली पूरपरिस्थिती, नद्यांचे पाणी पात्राबाहेर जाणे, अनेक ठिकाणी दरडी कोसळून विस्कळीत झालेली वाहतूक, केळी, पेरु, द्राक्ष, डाळींब इत्यादी फळपिकांचे झालेले मोठे नुकसान, राज्य सरकारने नुकसानीबाबत पंचनामे त्वरित करणे व शेतकऱ्यांना दर हेक्टरी ५० हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटपात विविध जिल्ह्यात झालेले भ्रष्टाचार, मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणातील मासेमारी बंद राहिल्याने मच्छिमारांचे झालेले नुकसान, दरवर्षी मे, महिन्यात कोकणात पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात, परंतु यावर्षी अतिवृष्टीमुळे पर्यटकांची संख्या कमी होणे व पर्यटन व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या पर्यटन व्यावसायिकांचे झालेले अतोनात नुकसान, दरवर्षी कोकणात साधारणपणे २३ मे पासून भात आणि नागलीची पेरणी सुरु होते, परंतु यावर्षी १५ मे पासूनच पावसाला सुरुवात झाल्यामुळे पेरणी पूर्वीची कामे न होणे, तसेच रायगड जिल्हयात रब्बी हंगामातील पिकांच्या कापणीची कामे सुरु असतांनाच पाऊस सुरु झाल्याने भात मातीत मिसळून पूर्णपणे वाया जाणे, कोकणातील सदरहू परिस्थिती पाहता कोकणातील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता शासनाने विशेष मदतीचे पॅकेज जाहिर करण्याची

लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, विशेष आर्थिक पॅकेज जाहिर करण्याची आवश्यकता, कांदा उत्पादक शेतकऱ्यांची होत असलेली पिळवणूक, राज्य शासनाने कृषि क्षेत्राला अग्रेसर ठेवण्यासाठी महाॲग्रो एआय धोरणास (२०२५ ते २०२९) शासनाने दिलेली मंजूरी, एका रुपयांत पीक विमा योजना बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, शेतकऱ्यांना कृषी विम्याची रक्कम दिली जात नसून विमा कंपन्यांना कृषि विम्याचा लाभ झाला असणे, संपूर्ण राज्यात बोगस बीटी बियाण्याचा धुमाकूळ सुरु असून यावर्षी बोगस बीटी बियाणे ३० टक्क्यापेक्षा जास्त विकले गेल्याची बाब निदर्शनास येणे, बिटी बियाणांची बिनधास्त विक्री सुरु असून त्यांचे बिंग फुटू नये म्हणून बियाणे लेबलविना, खुल्या पाकिटमध्ये विकले जात असणे, शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा निवडणूकी अगोदर केली असून अद्यापही सरसकट कर्जमाफीची घोषणा न करणे, कापसाच्या पालवीवर वाणी नावाचा रोग आला असून त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणे, तसेच शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धानाचे पैसेही अद्याप मिळालेले नसणे, दि. १ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीत विदर्भ व मराठवाडयातील २६७ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या बऱ्याच कुटुंबियांना अद्यापही आर्थिक मदत न मिळणे, विदर्भातून गोव्याला जाण्यासाठी ८६ हजार कोटी रुपयांचा शक्तिपीठ महामार्ग करण्याची आखलेली योजना, वास्तविक पाहता या अंतर्गत असलेल्या मंदिरांकडे जाण्यासाठी तयार असलेल्या उत्तम रस्त्यांचे जाळे, शक्तिपीठ महामार्गामध्ये १२ जिल्हयातील शेतकरी बाधित होणार असल्याने दि.१.७.२०२५ पासून १२ जिल्हयात व संपूर्ण महाराष्ट्रात रास्तारोको आंदोलन शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, सदर प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या काढून घेण्यात येणाऱ्या सुपिक जमिनी या मार्गासाठी लाखो झाडांची होणारी कत्तल व पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, यासाठी राज्य शासनाने नुकतीच २० हजार कोटीची तरतूद करणे व शेतकऱ्यांच्या विरोध असतांनाही दडपशाही करुन शेतकऱ्यांच्या जमिनी शक्तीपीठ महामार्गासाठी घेतल्या जाणार असणे, दिनांक २५ व २६ जून, २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर व लोणार तालुक्यातील समृध्दी महामार्ग वाहून जाणे, सदर मुसळधार पावसामुळे सोलार पंपासह संपूर्ण सेट, पाईप लाईन, स्प्रिंकलर सेट, केबल इत्यादी वाहून जाणे, सिबिलची अट व ओटीएस ची अट केल्यामुळे बँकेतर्फे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज न मिळणे, तसेच राज्य शासनाने नोकरभरतीमध्ये कंत्राटी भरती केली असून कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्याच्या अनुषंगाने वेतन मिळालेले नसणे, लिपिकाला १२ हजार, शिपायांना १० हजार इतका तुटपुंजा पगार दिला जाऊन एजन्सीला जास्तीत जास्त फायदा कमवून दिला जाणे, राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी कर्तव्यदक्ष आणि स्वच्छ प्रतिमेचे अधिकारी देण्याची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सदस्य पदी वादग्रस्त कारकीर्द राहिलेले विशेष पोलिस

महानिरिक्षक दिलीप भुजबळ यांची नियुक्ती करण्यात येणे, त्यामुळे कामगारांची व बेरोजगारांची फसवणूक केली जात असणे, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ६ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.